# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


क्रमांक :- विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१६/3003

दिनांक :- - 8 SEP 2016

प्रति,

**संचालक/प्राचार्य,**

सर्व खाजगी विनाअनुदानित पदवीका/पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,

अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- राज्यातील शासन मान्य खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित संस्थामधील व्यावसायीक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपुर्ती योजनेच्या अनुषंगाने संस्थांचे मुल्यांकन व दर्जा मानांकन आवश्यक असल्याबाबत**

**संदर्भ :-** १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- २अ/एडीएम/२०१६/१२१० दिनांक १ सप्टेंबर २०१६.

२. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक :- इबीसी-२०१६/प्रक्र२२१/शिक्षण १ दिनांक ३१/३/२०१६.

३. मा.आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, यांचे पत्र क्रमांक :- सकआ/शिक्षण/शैक्ष प्रति/२९९८ दि. ५/८/२०१६.

**महोदय,**

सोबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचा संदर्भ १ चा शासन निर्णय तसेच मा.आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संदर्भिय पत्र २ जोडलेले आहे. कृपया त्याचे अवलोकन करावे व दिलेल्या सुचनाप्रमाणे कार्यवाही करावी.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, संदर्भाधीन शासन निर्णयान्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत आपल्या संस्थामध्ये व्यावसायीक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपुर्ती योजनेच्या अनुषंगाने सविस्तर तरतुदी निर्गमित केलेल्या आहेत. शुल्क प्रतिपुर्तीबाबत सदर शासन निर्णयातील मुद्या क्रमांक १९ मध्ये पुढीलप्रमाणे तरतुद नमुद करण्यात आलेली आहे.

सदर योजनेअंतर्गत पात्र असणारे व्यावसायीक अभ्यासक्रम राबविणा-या सबंधित शैक्षणिक संस्थांनी पुढील ३ वर्षाच्या आत म्हणजेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत सक्षम शिखर संस्थेकडुन मुल्यांकन व दर्जाचा मानांकन प्राप्त करणे (Assesment and Accreditation ) आवश्यक राहील. तद्नंतर शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासुन सबंधित शिखर संस्थाकडुन मुल्यांकन व दर्जा निश्चीती करुन मुल्यांकण प्राप्त न केल्यास अशा संस्थांना मुल्यांकन व दर्जा मानांकन प्राप्त होईपर्यंत या योजनेतुन वगळण्यात येईल व त्यावर्षापासुन केवळ मानांकन प्राप्त करणा-या शैक्षणिक संस्थेमध्ये प्रथम

# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३


वर्षासाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांकरीताच सदर योजना लागू राहील. शासन निर्णयात नमुद केल्यानुसार राज्यातील शासन मान्य खाजगी विनाअनुदानित व कायम विना अनुदानित संस्थामधील व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपुर्तीसाठी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पर्यंत सक्षम शिखर संस्थेकडुन मुल्यांकन व दर्जाचा मानांकन (Assesment and Accreditation) प्राप्त करणे आवश्यक आहे. तसेच सदरची बाब विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताशी निगडीत असल्यामुळे सक्षम शिखर संस्थेकडुन मुल्यांकन व दर्जाचा मानांकन प्राप्त करुन घेण्याबाबतची आपल्या स्तरावर आवश्यक कार्यवाही व्हावी.

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.